**प्रशासकीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित**
**(एम्प्रेस मिल नंबर ३), सर बेझॉन्जी मेहता रोड, नागपूर ४४० ०१८**

**(अ) शेडस/इमारत पाडणे व पाडलेली सामुग्री घेऊन जाणे याबाबत माहितीचा तक्ता**

| अ.क्र | तपशील | अंदाजित क्षेत्रफळ (चौ.मी.) |
|---|---|---|
| १) | विव्हींग शेड | १०,७८५.०० |
| २) | सुरक्षा ऑफीस | १३३.०० |
| ३) | शौचालय | १०८.०० |
| ४) | कॉटन गोडावून नं.१ | ५७४.०० |
| ५) | कॉटन गोडावून नं.२ | १४८.०० |
| ६) | टाईम ऑफीसची इमारत | ३६०.०० |
| ७) | सायकल स्टॅन्ड शेडस | ६८.०० |
| ८) | भोजनालय कक्ष | ७७४.०० |
| ९) | उपाहार गृहाची इमारत | २०५.०० |
| १०) | गेट ऑफीस (गेट जवळ) | २५.०० |
| | **एकूण .. .. ..** | **१३,१८०.००** |

(जनरेटर रुम व सध्याचे प्रशासकीय कार्यालय सोडून)

(विव्हींग शेडच्या दक्षिण व पश्चिम बाजूने असलेल्या सुरक्षा भिंतीचा अंतर्भाव वरील विवरणात नाही. तसेच वरील शेडसमध्ये कोणत्याही सुरक्षा भिंतीचा अंतर्भाव नाही. तसेच या भिंतीना काही तोडफोड झाल्यास ती दुरुस्त करुन देण्याची जबाबदारी निविदाकारावर राहील) वरील क्षेत्र अंदाजीत असून निविदाकाराने निविदा भरण्याचे अगोदर मोजमाप करुन खात्री करुन घ्यावी.

**(ब) निविदाकाराने संबंधित शेड / इमारत पाडल्यानंतर पाडलेली सामुग्री घेऊन जाण्यासाठी खालीलप्रमाणे निविदा रक्कम भरावी.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | लोखंडी भंगार | रु | (अक्षरी रुपये |
| २) | लाकडी भंगार | रु | (अक्षरी रुपये |
| ३) | इतर इमारती भंगार | रु | (अक्षरी रुपये |
| ४) | एकूण .. .. | रु | (अक्षरी रुपये |

वरील निविदा रक्कमेवर नियमाप्रमाणे लागणारी कराची रक्कम भरण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

**निविदाकाराची सही व शिक्का**

**प्रशासकीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित**
**(एम्प्रेस मिल नंबर ३), सर बेझॉन्जी मेहता रोड, नागपूर ४४० ०१८**

**दूरध्वनी क्रमांक :** 0712-3293161 **भ्रमणध्वनी क्रमांक :** 9373124518

**शेडस/इमारत पाडणे व पाडलेली सामुग्री पूर्णतः घेऊन जाणे याबाबत आवश्यक त्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

१) निविदा प्रक्रीयेचा तपशील पान क्र.२ वर नमूद केल्याप्रमाणे असून तो निविदाकारास बंधनकारक आहे.

२) निर्धारित नमुन्यातील कोऱ्या निविदा प्रपत्राची किंमत प्रत्येकी रु १,०००/- (रुपये एक हजार फक्त) ना परतावा राहील.

३) निविदाकाराने निविदा प्रपत्र सादर करतेवेळी प्रत्येक पानावर सही करणे आवश्यक असून ज्या ठिकाणी खाडाखोड असेल त्या ठिकाणी निविदाकाराने सही करणे आवश्यक आहे. तसेच निविदेच्या अटी शर्तीचे पान नं. ४ ते ८ वर सही करुन स्कॅन करुन निविदा अपलोड करणे आवश्यक आहे.

४) सर्व पानावर सही नसलेली निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

५) निविदाकारास माहिती व तंत्रज्ञान कायदा २००० नुसार डीजीटल प्रमाणपत्र (सही व इन्स्क्रीपशन दोन्ही) कोणाही प्रमाणित संस्थेकडून (Certifying Authority) निर्धारित फी भरुन प्राप्त करावे लागेल. नंतरच ते निविदा भरण्यास पात्र होतील.

६) निविदा प्रपत्राचे पान नं. ३ (अ) मध्ये नमूद केलेल्या शेड / इमारत व्यतिरिक्त कोणतीही शेड / इमारत याचा अंतर्भाव या निविदेमध्ये नाही.

७) पान नंबर ३ वर नमूद केलेले शेड / इमारत संपूर्ण तोडून निविदाकारास सर्व बिल्डींग मटेरियल व सामुग्री बाहेर घेऊन जावी लागेल.तसेच जागा पूर्णपणे सपाट करावी लागेल.

८) शेड / इमारत पाडण्याकरीता लागणारी परवानगी निविदाकारास महानगर पालिका, नागपूर यांचेकडून घ्यावी लागेल. त्याकरीता लागणारे दस्ताऐवज निविदाकारास पुरविण्यात येतील. मंजूरी घेण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

९) निविदा प्रपत्र इतरांना हस्तांतरीत करता येणार नाही.

१०) निर्धारित नमुन्यात निविदा पान नं.२ वर नमूद केलेल्या कालावधीत महामंडळाचे Website https://mstc.maharashtra.etenders.in वर ऑनलाईन सादर करावी लागेल.

**११) महाराष्ट्र शासनाचे माहिती व तंत्रज्ञान (GAD) विभागाचे शासन निर्णय क्र GAD DIT 080/2 /2014 - DIT (MH), दि १३-८-२०१४ नुसार निविदा प्रपत्राचे किंमतीप्रित्यर्थ रु१,०००/-(रुपये एक हजार) व बिनव्याजी अनामत रक्कम रु १०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त) सिफी नेक्स्ट टेंडरमार्फत पुरविण्यात आलेल्या "ई पेमेंट गेटवे मार्फत ऑनलाईन प्रणालीद्वारे " आयसीआयसीआय बॅन्केत भरणा करावा लागेल. तसेच निविदाकारास ई-टेंडर शूल्काप्रित्यर्थ रु १,०३८/- (रुपये एक हजार अडतीस मात्र) ऑन लाईन भरावे लागतील. अनामत रक्कमेशिवाय तसेच अपू-या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.**

**टीप :- एस्क्रो खात्यात रक्कम खात्रीलायकरित्या जमा होण्याकरीता अर्जदारामार्फत तयार करण्यात आलेले RTGS चलन अर्जदाराच्या बॅन्केत अर्ज तयार करण्याच्या कालावधीचे एक दिवस अगोदर (म्हणजेच दि २६-१२-२०१४ रोजी बॅन्केच्या कामकाजाचे वेळेत ) अर्जदाराच्या बॅन्केत सादर करणे आवश्यक आहे, जेणेकरुन वेळेच्या आंत एस्क्रो खात्यात रक्कम ट्रान्स्फर होईल.**

**१२) निविदा उघडल्यानंतर निविदेच्या पान नं.३ वरील (ब) ४ मध्ये नमूद केलेल्या एकत्रित रकमेनुसार उच्चतम निविदाकारासोबत तसेच महत्तम देकाराच्या रक्कमेच्या ७५ टक्केपेक्षा जास्त देकार देणाऱ्या निविदाकारासोबत शुक्रवार दि २ जानेवारी,२०१५ रोजी दुपारी ४.०० वाजता महामंडळाच्या मुंबई येथील नोंदणीकृत कार्यालयात निविदा रक्कम वाढविण्याकरीता वाटाघाटी करण्यात येतील.**

१३) निविदेच्या पान नं. ३ वर (ब) ४ मध्ये नमूद केलेल्या एकत्रित रकमेनुसार जे निविदाकार वाटाघाटीस पात्र असतील अशा निविदाकारांना निविदा रक्कम वाढविण्याकरीता संधी मिळेल व नंतर वाटाघाटी समाप्त झाल्यानंतर वाटाघाटीत जो उच्चतम निविदाकारक असेल तो यशस्वी होईल. वाटाघाटीत नमूद केलेली वाढीव उच्चतम देयकाची रक्कम निविदेमध्ये पान क्र ३ (ब) १ ते ४ मध्ये नमूद केलेल्या रक्कमेच्या प्रमाणात लोखंडी भंगार, लाकडी भंगार व इतर इमारती भंगाराचे किंमतीमध्ये विभागली जाईल.

१४) निविदा उघडल्यानंतर जे निविदाकार वाटाघाटीस अपात्र ठरतील त्यांची अनामत रक्कम ई पेमेंट प्रणालीद्वारे निविदा प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर आयसीआयसीआय बॅन्केमार्फत निविदाकाराच्या खात्यात परत करण्यात येईल. वाटाघाटीनंतर पहिल्या तीन महत्तम निविदाकारांची जमा असलेली अनामत रक्कम आयसीआयसीआय बॅन्केच्या एस्क्रो खात्यात जमा राहील. उर्वरित निविदाकारांची जमा रक्कम वाटाघाटीनंतर निविदा प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर आयसीआयसीआय बॅन्केमार्फत ई पेमेंट प्रणालीद्वारे निविदाकाराचे बॅन्क खात्यात परत करण्यात येईल. उच्चतम निविदाकारास निविदा मंजूर झाल्याचे पत्र महामंडळाने दिल्यानंतर व त्याने संपूर्ण निविदा रक्कम महामंडळाकडे भरल्यानंतर सात दिवसांचे आत २ (दोन) निविदाकारांची अनामत रक्कम आयसीआयसीआय बॅन्केकडून ई पेमेंट प्रणालीद्वारे त्याचे बॅन्क खात्यात परत करण्यात येईल.

१५) कोणत्याही परिस्थितीत प्रथम, द्वितीय व तृतिय उच्चतम निविदाकारास निविदा उघडण्याचे तारखेपासून ६० दिवसापर्यंत त्यांचा देकार मागे घेण्याचा अधिकार उपलब्ध राहणार नाही. वरील कालावधीत त्यांची अनामत रक्कम ( EMD ) महामंडळाने आयसीआयसीआय बॅन्केत उघडलेल्या एस्क्रो खात्यात बिनव्याजी जमा रक्कम म्हणून कायम राहील.

**१६)** ज्या यशस्वी निविदाकाराचे निविदा प्रपत्र स्विकारले जाईल त्या निविदाकारास निविदेतील देकाराप्रमाणे देकाराची संपूर्ण निविदा रक्कम व लागू असलेल्या कराची रक्कम देकार स्विकारलेल्या पत्राच्या तारखेपासून १५ दिवसाचे आंत नागपूर येथील प्रशासकीय कार्यालयात "महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित" या नांवाने पेयेबल मुंबई येथील धनाकर्ष (Demand Draft) द्वारे भरावी लागेल. जर निविदा रक्कम व लागू असलेल्या कराची रक्कम १५ दिवसात न भरल्यास निविदा रद्द करुन अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१७) यशस्वी निविदाकारास जमा केलेल्या रक्कमेच्या तारखेपासून १५० दिवसांच्या आंत निविदेत अंतर्भूत असलेल्या शेडस / इमारत पाडून मटेरियल (सामुग्री) स्वखर्चाने जागेतून उचलावी लागेल. जर सदर मटेरियल (सामुग्री) वरील कालावधीत उचलली गेली नाही तर व्यवस्थापन अधिक ३० दिवसाची मुदत वाढवून देईल, परंतु वाढीव मुदतीत पाडलेली सामुग्री नेण्यासाठी त्यावर उर्वरीत सामुग्रीचे किंमतीवर २ टक्के दराने प्रती महिना जागेचे भाडे द्यावे लागेल व एकूण १८० दिवसात पाडलेली सामुग्री उचलली नाही तर सदर निविदा रद्द करुन अनामत रक्कम व अधिक जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल व राहिलेली सामुग्री नेता येणार नाही.

१८) निविदाकारास जमिनीचे खाली खोदकाम करुन सामुग्री काढण्याची परवानगी राहणार नाही.

१९) अनामत रक्कम रु १०,००,०००/-(रुपये दहा लाख फक्त) निविदेप्रमाणे काम पूर्ण झाल्यानंतर यशस्वी निविदाकारास महामंडळाने आयसीआयसीआय बॅन्केमध्ये उघडण्यात आलेल्या एस्क्रो खात्यातून ई पेमेंट प्रणालीद्वारे निविदाकाराच्या बॅन्क खात्यात परत करण्यात येईल. अनामत रक्कम परत करतेवेळी महामंडळास काही नुकसान झाले असल्यास ती वजा करुन बाकीची रक्कम परत करण्यात येईल.

२०) यशस्वी निविदाकारास मंजूर झालेल्या निविदा रक्कमेचा संपूर्ण भरणा केल्यानंतर व रु २००/- चे स्टॅम्प पेपरवर निविदेच्या अटी शर्ती नमूद असलेला करार केल्यानंतर निविदेत अंतर्भूत असलेल्या शेडस/इमारत पाडून, पाडलेली सामुग्री स्वखर्चाने आणि स्वतःच्या जबाबदारीने घेऊन जाता येईल. तसेच निविदा मंजूर झाल्यानंतर व संपूर्ण निविदा रक्कम भरल्यानंतर सदरहू सामुग्रीची सुरक्षा व संपूर्ण जबाबदारी ही निविदाकाराची राहील.

२१) शेडस / इमारत पाडताना, सामुग्री काढताना किंवा नेतांना निविदाकाराने नेमलेल्या कामगारांस अपघात अथवा इजा झाल्यास त्याची जबाबदारी निविदाकाराची राहील. त्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही. निविदाकाराने अशी लेखी हमी काम सुरु करण्यापूर्वी व्यवस्थापनास द्यावी लागेल.

२२) शेडस / इमारत पाडण्यापूर्वी निविदाकाराने नेमलेल्या कामगारांची फोटोसहीत यादी, त्यांचा राहण्याचा पत्ता, पोलीस तपासणी प्रमाणपत्र आणि त्यांचे वर्कमन कॉम्पेनसेशन कायदा किंवा सामुहिक इन्श्युरन्स (Group Insurance) अंतर्गत विमा काढून त्याची छायाप्रत निविदाकारास व्यवस्थापनाकडे सादर करावी लागेल.

२३) शेडस / इमारत पाडण्याकरीता लागणारे साहित्य निविदाकारास स्वतः आणावे लागेल.

२४) सकाळी ८.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीत निविदेत नमूद केलेल्या शेडस/इमारत पाडून सामुग्री बाहेर नेण्यास परवानगी राहील.

२५) पान नंबर तीन वर नमूद केलेल्या शेडस / इमारतीची पाहणी करुन निविदाकाराने आपले निविदा प्रपत्र ऑनलाईन सादर करावे. निविदाकाराने निविदा प्रपत्र, इमारत / शेडसची पाहणी करुन समाधान झाल्यानंतरच सादर केलेले आहे असे गृहीत धरण्यात येईल. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२६) निविदा रक्कमेव्यतिरिक्त महाराष्ट्र राज्यात लागू असलेल्या नियमाप्रमाणे कर लागेल, तो कर भरण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

२७) निर्गमित केलेले देकारपत्र खालील कारणामुळे रद्द करुन अनामत रक्कम जप्त करण्यात येईल :-

अ) कार्यालयास असे वाटले की, निविदाकार हा निविदेप्रमाणे काम पूर्ण करीत नसेल तर

ब) निविदाकाराची किंवा त्याच्या प्रतिनिधीची वर्तणूक बरोबर नसेल तर

क) निविदाकार किंवा त्याचे प्रतिनिधीने चोरी करण्याचा प्रयत्न केला तर

२८) शेडस / इमारत पाडणे व पाडलेली सामुग्री नेणे हे काम निविदेची पूर्ण रक्कम लागू असलेल्या करासह मिळाल्यावरच चालू करता येईल.

२९) यशस्वी निविदाकारास प्राप्त झालेले देकारपत्र दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीस हस्तांतरीत करता येणार नाही.

३०) प्राप्त झालेली निविदा नागपूर न्यायालयीन क्षेत्राच्या अंतर्गत समाविष्ट राहील.

३१) निविदाकार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना जी शेड / इमारत तोडणे आहे त्या परिसरातच प्रवेश दिला जाईल, बाकीचे भागात त्यांना जाण्यास बंदी राहील.

३२) शेडस / इमारत पाडतेवेळी व पाडलेली सामुग्री बाहेर नेतेवेळी कार्यालयीन प्रतिनिधी उपस्थित राहतील व त्यांच्या उपस्थितीतच निविदाकारास काम करावे लागेल.

३३) पाडलेली सामुग्री बाहेर नेतेवेळी निविदाकारास कार्यालयातून गेट पासेस बनवून घ्यावे लागतील.

३४) महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळास कोणतेही कारण न दर्शविता निविदा प्रक्रीया रद्द करण्याचा अधिकार आहे.

३५) निविदाकाराने काही विवाद उत्पन्न केल्यास व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ, मुंबई यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

३६) महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ महत्तम निविदा स्विकारण्यास बंधनकारक नाही. तसेच निविदेमध्ये काही अटी निविदाकाराने नमूद केल्या असल्यास, असे निविदा प्रपत्र रद्द करण्यात येईल.

३७) यशस्वी निविदाकारास सामुग्री त्यांच्या ज्या प्रतिनिधीकडून बाहेर न्यावयाची असेल त्या प्रतिनिधीचे ओळखपत्र व अधिकार पत्र प्रशासकीय कार्यालय, एमएसटीसी, नागपूर यांना द्यावे लागेल.

**३८) निविदाकाराने निविदा उघडतेवेळी महामंडळाच्या मुंबई येथील नोंदणीकृत कार्यालयात उपस्थित राहणे अपेक्षित आहे.**

३९) निविदाकाराने वर दर्शविलेल्या अटी व शर्ती पूर्णपणे समजून निविदा भरलेली आहे व अटी व शर्ती या निविदापत्राचा अविभाज्य भाग आहे आणि निविदाकारास तो पूर्णपणे मान्य आहे असे गृहीत धरण्यात आलेले आहे.

४०) निविदाकारास ऑनलाईन निविदा सादर करताना अडचणी असल्यास किंवा स्पष्टीकरण पाहिजे असल्यास त्यासंदर्भात निविदाकार, सिफी, नेक्स्टेंडर यांचेशी दूरध्वनी क्र 020-30187500 वर संपर्क करु शकतात.

**४१) निविदाकारास ऑनलाईन निविदा सादर करणे सोयीचे व्हावे म्हणून महामंडळाचे मुंबईस्थित नोंदणीकृत्त कार्यालयात तसेच नागपूर येथील प्रशासकीय कार्यालयात सोमवार, दिनांक १५ डिसेंबर,२०१४ रोजी दुपारी १२.३० वाजता विनामूल्य प्रशिक्षण देण्यात येईल. इच्छुकांनी निविदा भरतांना त्यांचे समस्यांचे निराकरण करण्याकरीता निर्धारीत वेळेत उपस्थित रहावे.**

४२) निविदाकार इंग्रजी किंवा मराठी भाषेतील निविदा प्रपत्रामध्ये ऑनलाईन निविदा सादर करु शकेल. परंतु इंग्रजी भाषेतील व मराठी भाषेतील अटी शर्तीचे तपशीलाबाबत वाद निर्माण झाल्यास इंग्रजी भाषेतील निविदेच्या अटी शर्तीचा तपशील ग्राहय राहील.

४३) निविदाकारांना सूचित करण्यात येते की, निर्धारित वेळेत निविदा सादर करता यावी म्हणून त्यांचे संगणक, सॉफ्टवेअर व इतर इक्युपमेंटस अप टु डेट आहेत याची खात्री त्यांनी करुन घ्यावी. तांत्रिक कारणामुळे निविदा सादर करण्यात अयशस्वी झाल्यास ते विचारात घेतले जाणार नाही.

४४) देकार स्विकारणे किंवा रद्द करण्याचा सर्व अधिकार महामंडळास राहील.

४५) निविदाकाराचा तपशील :-

| | |
|---|---|
| पूर्ण नांव | |
| पत्ता | |
| दूरध्वनी क्रमांक | |
| निविदाकाराचा पॅन नंबर | |
| दिनांक | |

मी निविदेच्या अटी शर्तीचे वाचन केले असून त्या मला मान्य आहेत.

**निविदाकाराची सही व शिक्का**

**दिनांक :**